महाराष्ट्र शासन
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
१५ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
मंत्रालय, मुंबई § ४०० ०३२

Email : tc१-env@mah.gov.in                    दूरध्वनी क्र. (०२२) २२०२९३८८

क्रमांक :- मावंअ २०२६/प्र. क्र.२९७/तां.क.१                    दिनांक :- २७ ऑक्टोंबर, २०२६

---

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय :- अभियान संचालक, माझी वसुंधरा अभियान संचालनालय हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत...

संदर्भ :-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कायासि १२, दिनांक १७.१२.२०१६.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/काया.१२, दिनांक १६.०२.२०१८.

३) माझी वसुंधरा अभियान मंजुरी शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, दिनांक १४.१०.२०२०.

४) माझी वसुंधरा अभियान संचालनालय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष निर्मिती शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, दिनांक ०४.१२.२०२०.

५) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, शासन निर्णय क्रमांक मावंअ २०२६/प्र.क्र.२९७/तां.क.१, दिनांक १२.१०.२०२६

निसर्गाशी असलेली कटीबद्धता निश्चित करण्यासाठी पृथ्वी, वायू, जल, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित उपाययोजना करून शाश्वत निसर्गपुरक जीवनपद्धती अवलंबिण्यासाठी राज्यात "माझी वसुंधरा" हे अभियान राबविण्यास संदर्भाधीन क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार माझी वसुंधरा अभियानाच्या अंमलबजावणीचे प्रभावी संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी शासनस्तरावर स्वतंत्र अभियान संचालनालय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष संदर्भाधीन क्रमांक ४च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये माझी वसुंधरा अभियान संचालनालयाचे

प्रमुख "अभियान संचालक" हे पद कंत्राटी तत्त्वावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली होते. तथापि, संदर्भाधीन क्रमांक ५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभियान संचालक, माझी वसुंधरा अभियान संचालनालय हे पद किमान मंत्रालयीन उप सचिव किंवा समतुल्य वेतनश्रेणी (एस-२५, रुपये ७८,८००-२,०९,२००) मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या राज्य शासनाच्या सेवेतील अधिकाऱ्यांमधून सामान्य प्रशासन विभागाच्या धोरणानुसार जाहिरात देऊन ३ वर्षांच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने भरण्यास मान्यता प्राप्त झाली आहे

२. त्यानुषंगाने शासनाकडून प्राप्त मान्यता व सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७.१२.२०१६ व दिनांक १६.०२.२०१८ च्या शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार, खालील पद प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी पात्र अधिकाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात येत आहे :-

| प्रतिनियुक्तीने भरावयाचे पद | पद संख्या | पात्रता |
|---|---|---|
| अभियान संचालक, माझी वसुंधरा अभियान संचालनालय | १ | किमान मंत्रालयीन उपसचिव समकक्ष वेतनश्रेणी एस-२५: रु. ७८,८००-२,०९,२००). |

३. सदर पदासाठी राज्य शासनाच्या सेवेतील किमान मंत्रालयीन उप सचिव किंवा समतुल्य वेतनश्रेणी (एस-२५) मधील समान वेतनबँड व ग्रेड पे धारण करणारे अधिकारी पात्र राहतील. प्रतिनियुक्तीचा कालावधी प्रारंभी ३ (तीन) वर्षे असून शासन निर्णयातील अटींनुसार वाढीयोग्य राहील. सदर पदाचे वेतन व भत्ते महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निधीमधून भागविण्यात येतील. प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवाराने सोबतच्या (सेवा तपशील) विवरणपत्रासह अर्जाची एक प्रत त्यांच्या संबंधित प्रशासकीय विभागाकडे पाठवून अर्जाची एक प्रत या विभागाकडे २१ दिवसांत (सोमवार, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत) पाठविण्याबाबत कळविण्यात यावे, ही विनंती. कृपया सदर जाहीरात आपल्या विभागातील व अधिनस्त सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक पात्र अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

(निलेश पोतदार)
अवर सचिव तथा शा. श्रे. २,
महाराष्ट्र शासन

प्रति माहितीस्तव :-

१) मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
३) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
४) अभियान संचालनालय, माझी वसुंधरा अभियान.
५) निवड नस्ती कार्यासन- तां.क. १

**अभियान संचालक, माझी वसुंधरा अभियान संचालनालय** हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यासंदर्भात इच्छुकता मागविण्यासाठी विहित करण्यात आलेला नमुना (**सेवा तपशील**) विवरणपत्र

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव | |
| २ | पदनाम / संवर्ग<br>व सेवार्थ क्रमांक | |
| ३ | विभाग / सध्याचे कार्यालय नाव, पत्ता व दूरध्वनी क्र. | |
| ४ | पदाची वेतनश्रेणी | |
| ५ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ६ | शैक्षणिक अर्हता | |
| ७ | स्थायीकरण प्रमाणपत्र | |
| ८ | जन्म दिनांक | |
| ९ | सेवेत आल्याचा दिनांक | |
| १० | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ११ | मागील ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाच्या (साक्षांकित प्रती) – मूळ गोपनीय अहवाल पाठवू नये. | |
| १२ | मालमत्ता व दायित्व सादर केली आहेत का? | |
| १३ | यांचे ५०/५५ व्या वर्षे पुनर्विलोकन झाले आहे किंवा कसे? (लागू असल्यास) | |
| १४ | संबंधित अधिकाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास (पूर्वीचा कालावधी) (प्रतिनियुक्तीचा एकूण कालावधी १० वर्षापेक्षा जास्त नसावा). | |
| १५ | मागील प्रतिनियुक्तीवरून परत आल्याच्या दिनांकापासून ३ वर्षे पूर्ण झाली आहेत का? | |
| १६ | संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे?<br>तसेच,त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार / लाचलुचपत गुन्ह्यांसदर्भात प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे ? | |
| १७ | प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे? | |

******